

## भारतीय स्त्री-शिक्षणाचे जनक

# महात्मा फुले व सावित्रीबाई फुले


मुख्य संपादक

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार

संपादक

प्रा. डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे


Scanned by CamScanner

ISBN No. 978-81-955479-2-0

संपादक

डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे

इतिहास विभागप्रमुख,

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

मो. ९९२३३५१६७८

प्रकाशक

सिध्दी पब्लिकेशन हाऊस

६२४, बेलानगर, भावसार चौक,

तरोडा (खु.) नांदेड ३ ४३१६०५

मो. ९६२३९७९०६७

E-mail: shrishprakashan२००९@gmail.com

www.wiidrj.com

मुद्रक

अनुपम प्रिंटर्स , श्रीनगर, नांदेड (महा.)

९१७५३३२४४३७

प्रथमावृत्ती : ११ एप्रिल २०२२

© सर्वाधिकार : महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूरच्या अधीन

मुखपृष्ठ : तेजस रामपूरकर

अक्षरजुळवणी : डॉ. राजेश गं. उंबरकर

मुद्रित शोधन : डॉ. अनिल मुंढे

मूल्य : ५००/-

या पुस्तकातील कोणताही भाग किंवा मजकूर संपादकाच्या व लेखकाच्या परवानगीशिवाय संदर्भासाठी वापरू नये.

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | भारतीय संविधान आणि महात्मा फुले यांची विचारधारा | डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले | ९९ |
| १३. | महात्मा जोतीराव फुले यांचे पुणे नगरपालिकेतील कार्य | डॉ. शिंदे आर. डी. | ११० |
| १४. | महात्मा फुलेंचे स्त्री–पुरुष समानतेविषयक विचार व कार्य | प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम | ११८ |
| १५. | महात्मा फुले यांचे धार्मिक विचार | प्रा. शिवाजी भगवानराव ताटे | १२६ |
| १६. | महात्मा फुले आणि सत्यशोधक समाज | अर्चना राजेंद्र गायकवाड | १३२ |
| १७. | म. ज्योतिबा फुले यांचे स्त्री उद्धाराचे कार्ये | डॉ. डी. पी. गायकवाड | १४० |
| १८. | महात्मा फुले यांचे शेती विषयक विचार | डॉ. विजया हरिदास गायकवाड | १४४ |
| १९. | महात्मा फुले यांच्या शिक्षणविषयक विचारांची प्रासंगिकता | डॉ. सचिन सि. रूपनर | १५० |
| २०. | महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य | प्रा. गोविंद दे. मुंढे | १५९ |
| २१. | 'महात्मा फुले यांचे कृषीविषयक विचार आणि कार्य' | प्रा. तानाजी जाधव | १६५ |
| २२. | महिला सबलीकरणातील सावित्रीबाई यांचे योगदान | प्रा. अस्मिता विश्वनाथ वांद्रे | १७२ |
| २३. | मराठी साहित्यातील महात्मा फुले यांचे योगदान | अजय श्रीराम मुरमुरे | १७८ |
| २४. | महात्मा ज्योतीबा फुलेंचे कृषि विषयक विचार | प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे | १८७ |
| २५. | महात्मा फुले यांचे वाङ्मयीन आणि सामाजिक कर्तृत्व | प्रा. डॉ. आसिया चिश्ती | १९५ |
| २६. | महात्मा फुले यांचे स्त्री उध्दाराचे कार्य | प्रा. शिंदे ज्योती | २०१ |
| २७. | महात्मा ज्योतिबा फुले यांचे जीवन व कार्य | प्रा. डॉ. रामभाऊ देवराव काशीद | २०६ |




Scanned by CamScanner

# महात्मा फुले यांच्या शिक्षणविषयक विचारांची प्रासंगिकता

**डॉ. सचिन सि. रूपनर**

सहा.प्राध्यापक अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर.

**प्रास्ताविक:**

सन १८१८ मध्ये पेशव्यांच्या पराभवानंतर भारतात ब्रिटिशांची सत्ता स्थिर झाली. प्रारंभीच्या काळात राज्यकारभाराची सूत्रे एलफिन्स्टन, माल्कम या सारख्या दूरदर्शी, कर्तव्यतत्पर व मुत्सद्दी अधिकाऱ्यांच्या नियंत्रणात होती.एतद्देशिय जनतेच्या मनात ब्रिटिशांबद्दल तिरस्कार निर्माण होणार नाही याची या अधिकाऱ्यांनी विशेष काळजी वाहिली. आपले शासन स्थिरावल्यावर समाजाला नवे शिक्षण देणे व सुधारणा घडवून आणणे या कार्याला त्यांनी प्राधान्य दिले. त्यांनी भारतात शिक्षणप्रसाराला चालना दिली. या शिक्षणाच्या प्रसारामुळे महाराष्ट्रात नवशिक्षित तरुणांची एक पिढी उदयास आली. पाश्चिमात्य संस्कृती, त्यांनी केलेली भौतिक प्रगती, उदारमतवाद, स्वातंत्र्य, मानवता, समता यासारख्या आधुनिक विचारांचे तसेच तत्त्वांचे ज्ञान या तरुणांना प्राप्त झाले.

या नवविद्येचे बाळकडू प्यायलेल्या तरुणांनी भारतातील आपल्या धार्मिक व सामाजिक जीवनाकडे चिकित्सक भूमिकेतून, परिक्षणाच्या जाणिवेतून निरीक्षण करण्यास प्रारंभ केला. त्यातूनच सामाजिकव धार्मिक सुधारणांबरोबरच देशात चळवळींना गती प्राप्त झाली. या सामाजिक व नैतिक अध:पतनाची जाणीव झालेल्या नवशिक्षित तरुणांना समाजाच्या सामाजिक व धार्मिक जीवनात परिवर्तन घडवून आणणे निकडीचे वाटू लागले, त्यातूनच त्यांनी आपल्या विचार, लेखन व कृतीद्वारे समाजात परिवर्तन घडवून आणण्यास प्रारंभ केला. समाज सुधारण्याची तळमळ असणाऱ्याया नवशिक्षित तरुणांनी परंपरागत आचार-विचार, रूढी-परंपरा, अंधश्रद्धा यावर प्रखर टीका करण्याबरोबरच त्यांनी समाजाला नवविचारांचे ज्ञान प्राप्त करून दिले. समाजाची बुद्धिनिष्ठता जागृत होऊन



Scanned by CamScanner

समाजाने आत्मपरिक्षणाने धार्मिक व सामाजिक जीवनातील दोष दूर करावेत व समाज सुधारणेला गती मिळावी म्हणून या सुधारकांनी अपार कष्ट घेतले. त्यांच्या या कार्यामुळेच महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेला गती मिळाली. अशा या समाजसुधारकांमध्ये महात्मा फुले हे अग्रस्थानी होते. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्याशैक्षणिक विचारांच्या प्रासंगिकतेवर एक दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न असणार आहे.

**महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर :**

महात्मा जोतीबा फुले यांनी आपले व्यक्तिमत्व स्वयंप्रेरणेने आणि आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनी घडविले होते. कृतिशील क्रांतिकारक असा त्यांचा मूळ पिंड होता. त्यांनी आपले संपूर्ण जीवन समाजसेवेसाठी वाहिले. म्हणून त्यांचा उल्लेख आधुनिक भारताचे पहिले समाज क्रांतिकारक म्हणून केला जातो. ते सामान्यातील सामान्य असले तरी विचाराने आणि कर्तृत्वाने ते असामान्य असे होते. त्यांनी समाजातील विषमतेविरुद्ध एक मोठे बंड पुकारले होते. ते नुसते बोलघेवडे सुधारक नसून कर्ते सुधारक होते. सर्वसामान्य जनांसाठी रात्रंदिवस झटणारे एक सेवक होते. विकसनशील व प्रयोगशील असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. समाजातील चांगल्या वाईट प्रवृत्तींचा अन्वयार्थ लावण्याचा ते नेहमी प्रयत्न करीत असत. अस्पृश्य व स्त्रियांच्या उद्धारासाठी ते चंदनासारखे झिजले. प्रत्येक गोष्टीच्या मुळापर्यंत जाऊन त्यावर चिंतनशीलपणे विचार करण्याचा त्यांच्या स्वभावामुळे त्यांना "महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर" असे संबोधले जाते. म्हणून त्यांनी त्या काळात शिक्षणविषयक, समाजविषयक, शेतीविषयक, अस्पृश्यतेबद्दल आणि स्त्रीमुक्तीबद्दल जे विचार मांडले ते आजही प्रासंगिक आहेत असेच आपल्याला जाणवते. म्हणून त्यांच्या विचारांची प्रासंगिकता येथे लक्षात घेणे गरजेचे ठरते.

**महात्मा फुले यांच्या विचारातून व्यक्त होणारी शिक्षणाची उद्दिष्टे :**

०१. शिक्षणाद्वारे व्यक्तीस समर्थ बनविणे.

०२. धर्म,वंश,जात,लिंग यापैकी कोणत्याही घटकाचा विचार न करता मानवतावादी मूल्यांचा विकास घडवून आणणे.

०३.व्यक्तीची विवेकबुद्धी व व्यक्तिस्वातंत्र्याला वाव देणे.

०४. शिक्षणाचे सार्वत्रिकिकरण करून स्त्रिया तसेच वंचित असा असणारा बहुजन समाज व उपेक्षितसमाज यांना शिक्षण व न्याय देणे.



Scanned by CamScanner

०५. शिक्षणाच्या मदतीने चारित्र्यसंपन्न समाज निर्माण करणे व त्याद्वारे अंधश्रद्धा व अस्पृश्यनष्ट करणे.

०६. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव अशी मूल्ये विकसित करून व्यक्तिस्वातंत्र्याचा विकास घडविणे.

**महात्मा फुले यांच्या शिक्षणविषयक विचारांची प्रासंगिकता :**

शिक्षण हे मानवी विकास आणि सामाजिक परिवर्तन याकरिता अतिशय महत्त्वाचे प्रभावी असे साधन असल्याचे अनेक देशांच्या लक्षात आल्याने त्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. अनेक राष्ट्रांनी चांगल्या शिक्षणाद्वारे आपली प्रगती घडवून आणली आहे. असेच प्रयत्न महाराष्ट्रातही काही व्यक्तींनी केल्याचे प्रकर्षाने जाणवते. त्यात प्रामुख्याने महात्मा जोतीराव फुले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. त्यांनी आपले शिक्षणविषयक विचार त्यांच्या विविध ग्रंथांमधून तसेच हंटर कमिशनपुढे दिलेली साक्ष यातून व्यक्त केले आहेत. त्यांनी स्त्रिया आणि अस्पृश्ययांच्याशिक्षणासाठी बहुमोल असे प्रयत्न केले.

तत्कालीन समाज हा शैक्षणिक दुरावस्थेने ग्रासलेला होता. शिक्षणाचा अभावामुळे जनता दुष्टचक्रात अडकलेली होती. या जनतेच्या दुःख-दारिद्र्याचे मूळ त्यांच्या अज्ञानात असल्याचे महात्मा फुले यांनी नेमकेपणाने हेरले.त्यांनी इ.स.१८८२मध्ये ब्रिटिश सरकारने नेमलेल्या विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखालील आयोगापुढे साक्ष देताना आपल्या देशातील शैक्षणिक समस्यांचा उलगडा केला. त्यातून त्यांचे शिक्षणाविषयीचे विचार व्यक्त होतात.

त्यांनी आपल्या वैचारिक तत्वज्ञानातून शिक्षणाच्या अभावामुळे समाजाची होणारी दुर्दशा कथिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार समाजात परिवर्तन घडवण्यासाठी, मानवाचे जीवन अधिक सुखसमृद्ध व ध्येयपूर्ण होण्यासाठी शिक्षण फार महत्वाचे आहे. त्यासाठी त्यांनी औपचारिक व अनौपचारिक अशा दोन्ही प्रकारच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. तत्कालीन परिस्थितीत शिक्षणाच्या प्रसाराची कोणत्याही साधनांची उपलब्धता नसताना महात्मा फुले यांनी शाळा सुरु करून त्याद्वारे प्रत्यक्ष औपचारिक शिक्षणाचा प्रारंभ केला. तर आपल्या साहित्यिक लेखनातून व वेळोवेळी लिहिलेल्या वर्तमानपत्रातील लेखांतून त्यांनी अनौपचारिक शिक्षणाचा प्रसार केला. शिक्षणाद्वारे मानवाचा विकास होऊन त्याला चांगले जीवन जागता येईल हा त्यांच्या शैक्षणिक विचारांचा मुख्य हेतू होता.

Scanned by CamScanner

"अज्ञान म्हणजे अंधार व शिक्षण म्हणजे प्रकाश. शिक्षण हे सर्व सुधारणांचे मूळ आहे. कनिष्ठ वर्गातील लोकांना ज्ञानाचे दरवाजे खुले करून त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार केला तर समतेच्या कल्पनेने स्फुरलेले कनिष्ठ वर्गातील लोक सामाजिक समतेसाठी बंड करतील या उद्देशांनी त्यांनी शिक्षण व समता यांचे निशाण १८४८ साली उभारले आणि शूद्र व स्त्रिया यांना शिक्षण देण्याचे ठरवले".१

वरील सर्व कारणांमुळे महात्मा फुले यांनी शिक्षणातील परिवर्तनासाठी १९ ऑक्टोबर, १९८२ ला हंटर आयोगाला निवेदन दिले होते. त्यामध्ये त्यांनी शिक्षणाचा सर्वंकष विचार मांडलआहे.त्याचे महत्त्व आजही निर्विवाद आहे. त्यांनी लॉर्ड मेकॉलेच्या खलित्यास 'शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे' या विचाराला कडाडून विरोध केला. त्यांच्या मते प्रथम 'खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण द्यावे नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण द्यावे'. 'आधी कळस मग पाया' असे न होता 'आधी पाया मग कळस' अशा स्वरूपाच्या शिक्षणपद्धतीचा स्वीकार करावा. त्यांनी प्रथम उपेक्षितांना व नंतर अपेक्षितांना शिक्षण हे तत्त्व स्वीकारले होते.

महात्मा फुले हे सक्तीचे व मोफत शिक्षण या विचारांचा पुरस्कार करणारे पहिले भारतीय होते. प्राथमिक शिक्षण प्रत्येक बालकाचा हक्क आहे आणि तो त्यांना मिळाला पाहिजे. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केल्यास विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होईल असे त्यांनी मत मांडले. जे आजदेखील खरे ठरते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने आपल्या देशात जे मोफत व सक्तीचे शिक्षण सुरू केले ते शिक्षण म्हणजे जोतीरावांच्या विचाराचाचएक भागमानावा लागेल. म्हणूनचआपल्या देशात शिक्षणाचा प्रसार झपाट्यान झाला. कारण मोफत व सक्तीच्याशिक्षणामुळे सर्वांना शाळेत प्रवेश घेणे सोपे झाले व शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यापर्यंत, गोरगरिबांच्या घरापर्यंत पोहोचली. सर्वांना शिक्षण घेणे सुलभ झाले. तेव्हा जर शिक्षण मोफत नसते तर मोलमजुरी करणाऱ्यांसाठी हे क्षेत्र वर्ज्य ठरले असते. आज आपण पाहतो उच्च शिक्षण महाग होत चालले आहे. आज डॉक्टर, इंजिनिअरहोणारे विद्यार्थी तुलनेने समाजाच्या उच्च वर्गातील अधिक आहेत.कारण ते शिक्षण घेणे सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे नाही. म्हणूनसमाजातील



Scanned by CamScanner

सर्वसामान्य व्यक्ती आजही त्या क्षेत्रापासून दूर आहे.आजही इंजिनिअर,डॉक्टरहोणाऱ्यांची संख्या तुलनेने कमी असल्याचे चित्र नजरेस पडते.

जी गोष्ट या उच्च शिक्षणाबाबत होत आहे तीच गोष्ट कदाचित प्राथमिक शिक्षणातबाबतही घडली असती. आमच्या देशातील बहुसंख्य असणाऱ्या बहुजन समाजातील मुले,ग्रामीण भागातल्या खेडूत समाजातील मुले या शिक्षणापासून वंचित राहिली असतीआणि पर्यायाने त्यांची प्रगती कुंठली असती.म्हणून जोतीरावांनी त्यावेळी मांडलेले मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे विचार आजही महत्त्वाचे ठरत आहेत.आज समाजात मोठ्या प्रमाणात जो शिक्षणाचा प्रसार व प्रचार झाला आहे त्याला फुल्यांचे मोफत व सक्तीचे शिक्षण हा विचार महत्वाचा ठरला आहे.

तसेच 'प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया असल्यामुळे ते उच्च दर्जाचे असावे व त्याचे शिक्षण गुणवत्तापूर्ण व दर्जेदार होण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक असणे हे देखील गरजेचे आहे' यावरही त्यांनी भर दिला आणि शिक्षणाद्वारे केवळ कारकून वर्ग तयार होऊ नये तर जीवनोपयोगी शिक्षण देऊन मानवी जीवन जगण्यास सक्षम बनवणारे नागरिक निर्माण व्हावेत यासाठी औपचारिक शिक्षणाबरोब च त्यांना व्यावसायिक शिक्षण किंवा कौशल्याधिष्ठित शिक्षण देण्याचा विचार त्यांनी मांडला. जो आजच्या आधुनिक युगात अत्यंत उपयुक्त आणि महत्त्वपूर्ण ठरताना दिसतो. "प्रचलित माध्यमिक शिक्षण हे सर्वसामान्यांच्या जीवनाच्या दृष्टीने अव्यवहार्य व अयोग्य आहे" असे मत व्यक्त करून जोतीराव म्हणाले : "कारकून आणि शिक्षक निर्माण करणे एवढाच काय तो त्याचा उपयोग. शिक्षक आणि विद्यार्थी हे मॅट्रिक परीक्षेत उगाच गढुन जातात.या अभ्यासक्रमाला व्यावहारिक स्वरूप नाही. विद्यार्थ्याला, भावी स्वतंत्र जीवनात समर्थ करील असे ते शिक्षण नसते..."[२]महात्मा फुल्यांचे हे विचार सध्याची शिक्षणपद्धती पाहता अतिशय योग्य आहे असेच जाणवते.

इंग्रजांनी आपल्या देशात शिक्षण देण्यास आरंभ केला. मात्र या देशाची सुधारणा व्हावी, भारतीयांच्या ज्ञानात भर पडावी, त्यांना इतर शास्त्रांची माहिती व्हावी,एतद्देशिय लोकांनी शिक्षणाची कास धरून आपली प्रगती साधावी अशा हेतूने हे शिक्षण सुरू केले नव्हते; तर इंग्रजांना तत्कालीन परिस्थितीत भारतात आपले राज्य चालविण्यासाठी



Scanned by CamScanner

कामगारांची / कारकुनांची गरज होती. त्यांना आपल्या देशातून कामगार आणणे व राज्य चालवणे शक्य नव्हते म्हणून त्यांनी येथील लोकांना सुशिक्षित करण्याचा प्रयत्न सुरू केला आणि त्याला अनुसरणारी शिक्षण पद्धती त्यांनी अवलंबिली;जी कारकून तयार करणारी होती. आजही आपल्या देशात इंग्रज गेले परंतु त्यांनी सुरू केलेली शिक्षणव्यवस्था त्यांच्याच नियमांना अनुसरत तशीच थोड्याफार बादलाने सुरु आहे.ही शिक्षणपद्धतीत्याकाळी इंग्रजांनी आरंभिलेल्या शिक्षणपद्धतीला बहुतांशअनुसरणारीआहे. त्यामध्ये आपण फारसे क्रांतिकारक असे बदल केलेले नाहीत. त्यात आपण अभ्यासक्रमाव्यतिरिक्त,मूल्यमापनपद्धती व्यतिरिक्त इतर कोणतेही फारसे बदल करत नाही. फारतर आपण सेमिस्टर पद्धती लागू करतो, ६० : ४० किंवा ७५ : २५ प्याटर्न लागू करतो किंवा BestOf 5 ची संकल्पना लागू करतो, थोडाफार अभ्यासक्रम बदलतो,GradingSystem चे अनुसरून करतो. पण हे सर्व वरवरचे बदलअसतात. म्हणजे आपण आत्मा न बदलता व्यक्तीचे केवळ कपडे बदलतो आणि तिच व्यक्ती समाजात नवी म्हणून नव्याने मांडतो. शिक्षणक्षेत्रात आजही आमुलाग्र बदलाला प्रचंड वाव आहे. आजच्या आपल्या जुन्याच शिक्षणपद्धतीमुळे आपण कारकून घडवत आहोत. केवळ सुशिक्षितबेकारांची संख्या वाढवतोय. रोजगारनिष्ठ, जीवननिष्ठविध्यार्थी घडवण्याऐवजी आपण परीक्षाकेंद्रित विध्यार्थी घडवत आहोत.पण जर या शिक्षणाबरोबरच फुले यांच्या मताप्रमाणे विद्यार्थ्याला कौशल्याधिष्ठित, व्यावसायिक शिक्षण दिले तर तो त्याच्या स्वतःच्या पायावर उभा राहू शकेल, स्वतःचा विकास घडवू शकेल. पण असे होत नाही. त्यांच्या याच विचाराचे अनुसरण आज आपल्याला नवीन शैक्षणिक धोरण ठरवताना केल्याचे काही प्रमाणात दिसते. उदा. आज शिक्षणक्षेत्रामध्ये B-Voc सारखेजे काही नवे अभ्यासक्रमकिंवा उपक्रम राबविण्यात येत आहेत त्याचेमूळ फुले यांच्या विचारातचआहे.

मोलमजुरांच्या, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाबद्दल सवलती देण्याबाबत व त्यांची शाळेतील उपस्थिती वाढण्यासंदर्भात त्यांच्या दारिद्र्याची कारणमीमांसा करताना जोतीराव म्हणतात,- "त्यांचे बरेच दारिद्र्य, त्यांच्याठायी असलेल्या स्वावलंबनाचा अभाव आणि सुशिक्षित नी



Scanned by CamScanner

बुद्धिवान वर्गावर सर्वस्वी अवलंबून राहण्याची त्यांची सवय याला कारण शेतकऱ्यांमधील शिक्षणाची दु:स्थित होय. शेतकरी आणि दुसरे गरीबवर्ग हे प्राथमिक शिक्षणाचा काही फायदा घेऊ शकत नाहीत. त्यांच्यापैकी काही थोड्याच लोकांची मुले प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतून आढळतात, परंतु ती शाळेत फार काळ टिकून राहत नाहीत. कारण त्यांचे पालक दारिद्र्यामुळे अतिशय गांजलेले असतात. शेतकरी आणि गरीब वर्ग यांना आपली गुरे राखण्यासाठी व शेतीचे काम करण्यासाठी हवी असतात".

"त्यांना शाळेत टिकवून धरण्यासाठी त्यांना शिष्यवृत्या किंवा बक्षिसे यांचे प्रलोभन सरकारने ठेवलेले नाही".[३] यावरून महात्मा फुले यांच्या दुरदृष्टीचा परिचय होता. आज आपल्या राज्यात ज्या वेगवेगळ्या प्रकारच्या ज्या शिष्यवृत्या आहेतत्या सुरू करण्यामागे फुले यांचे विचारच करणीभूत असावेत असे वाटते. त्यामुळे अनेक गरीब होतकरू व हुशार मुलांना चांगले शिक्षण घेणे शक्य होत आहे. अन्यथा हे विद्यार्थी गरीबीच्या खाईत लोटले गेले असते आणि पैशाअभावी अज्ञानी राहून आपली प्रगती करू शकले नसते. या सरकारी शिष्यवृतीमुळे आज आपणाला अनेक आर्थिकदृष्ट्या मागास असणारे विध्यार्थीउच्च शिक्षण घेऊन मोठ्या पदावर नोकरी करीत असलेले दिसतात.

या सर्व घटकांबरोबरच महात्मा जोतीरावांनी स्त्री शिक्षणालाही अतिशय महत्त्व दिले आहे. मुळातच त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात स्त्रियांना शिक्षण देण्यापासून केली(हे सर्वज्ञात आहेच त्याचा वेगळा परिचय येथे करून देण्याची आवश्यकता वाटत नाही). कारण 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी' या उक्तीप्रमाणे त्यांनी स्त्रियांना शिक्षण देण्यास अग्रक्रम दिला. "स्त्रीशिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलाचे शिक्षण. आपण जर एखाद्या पुरुषाला शिक्षण दिले तर ते एकट्याला दिल्यासारखे आहे. परंतु जर एका स्त्रीला शिक्षण दिले तर ते सर्व कुटुंबाला दिल्यासारखे आहे हे ओळखून जोतिबांनी स्त्री शिक्षणाला प्रारंभ केला".[४] "जोतिराव हे स्त्रीमुक्तीचे आद्यप्रवर्तक होते. समाजमान्यता, केशवपनाला विरोध, बालहत्या प्रतिबंध आणि विधवांना आधार अशी अनेक कार्य स्वत:उदाहरण घालून त्यांनी सुरू केली".[५] त्यातून त्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सर्वप्रथम स्त्रीउद्धारासाठी आपले लक्ष वळविले. तत्कालीन दुष्टचक्रातून त्यांनी स्त्रियांची सोडवणूक करण्यासाठी धडपड केली.



Scanned by CamScanner

महात्मा फुले यांनी ग्रामीण भागातील लोकांच्या, मोलमजुरी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाबाबत जी खंत व्यक्त केली होती त्यात आजही फार मोठा बदल झालेला आहे असे नाही. तर सद्यस्थितीत आधुनिक शिक्षणाच्या एकंदरीत सर्व प्रक्रियेत खाजगी, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, इंग्रजी माध्यमाच्या शाळा व महाविद्यालयांमध्ये सामान्यातील सामान्याच्या मुलांना प्रवेश घेणे शक्य होत नाही. आज आपण डोळसपणे पाहिले तर महात्मा फुले यांचे गुणवत्तापूर्ण शिक्षण महाग झालेले आहे असे हे चित्र आपल्या डोळयासमोर येईल. कारण वरील शाळा, महाविद्यालयांच्या प्रवेश शुल्काची रक्कम फार मोठी असते आणि ती सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारी नाही. म्हणून आजही हा गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी दर्जेदार शिक्षणापासून वंचितच आहे.

आजही या देशात शाळाबाह्य मुलांमध्ये आर्थिकदृष्ट्या गरीब असणाऱ्या दलित, भटके, विमुक्त, आदिवासी, मुस्लीम समाजातील मुले सर्वाधिक आहेत. आजही बालकामगार, आदिवासी तांडे, ऊसतोड कामगार, भटक्या समाजातील लोकांच्या वस्त्या, भटके मेंढपाळ धनगर, वेश्या, विधवा स्त्रिया, परित्यक्ता स्त्रिया, देवदासी या सर्वांची मुले व अनाथ मुले यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचलेले नाही. आजही या सर्व घटकांना व त्यांच्या मुलांना मुख्य प्रवाहात आणणे व त्यांना शिक्षण देणे काळाची गरज आहे. शिक्षण क्षेत्रात अनेक बदल झाले असले तरी आजही अनेक प्रश्न अनुत्तरितच आहेत.

**समारोप :**

शिक्षणाच्या माध्यमातून जो हेतू साध्य करायचा होता तो अजूनही साध्य झालेला नाही आणि हाच हेतू साध्य करण्यासाठी आजही आपण जर महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारांची कास धरली तर तो हेतू नक्की साध्य होऊ शकेल असे वाटते. म्हणून महात्मा फुलेंचे हे शिक्षणविषयक विचार आजही समाजाच्या सर्वांगीण परिवर्तनासाठी महत्त्वपूर्ण व प्रेरणादायी ठरतात.शिक्षणाच्या अभावामुळे माणसाचा बौद्धिकदृष्ट्या व नैतिकदृष्ट्या ऱ्हास होतो परिणामत: त्याची आर्थिक व व्यवहारिक क्षेत्रात पीछेहाट होते. त्यामुळे तो आपले धैर्य व आत्मविश्वास गमावून बसतो. सध्या शिक्षणात दिसून येणारी गळती, होत चाललेला मानवीमूल्यांचा, सामाजिकमूल्यांचा, नैतिकमूल्यांचा ऱ्हास आणि



Scanned by CamScanner

समाजातील स्वार्थी वृत्ती अशा विविध कारणांमुळे जोतीरावांचे शिक्षणविषयक विचार सद्यस्थितीत अत्यंत उपयुक्त आहेतअसे येथे नमूद करावेसे वाटते.

**संदर्भग्रंथ:**


१. नरके, हरी (संपा.),**"महात्मा फुले : साहित्य आणि चळवळ"**,महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशनसमिती, महाराष्ट्र शासन मुंबई, आठवी आवृत्ती, २०१८, पृ.५३.

२. तत्रैव,पृ. ७२. तत्रैव,पृ. ६६.

३. भिडे, जी.एल., पाटील,एन.डी.,**"महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास"**, फडके प्रकाशन,कोल्हापूर,पाचवी आवृत्ती, १९९८, पृ. ७४.

४. नांदेडकर, व.गो., **"राजकीय विचार आणि विचारवंत"**, डायमंड पब्लिकेशन, पुणे, जानेवारी, २०११,पृ.२७५.




Scanned by CamScanner

भारतीय सुधारणावादी चळवळीमध्ये महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य अत्यंत महत्त्वपुर्ण आहे. त्यामध्ये विशेषतः स्त्री उध्दारासाठी, स्त्री शिक्षणासाठी त्यांनी १९ व्या शतकात मांडलेले विचार, प्रत्यक्ष केलेले कार्य हे क्रांतीकारक स्वरुपाचे होते. फुले दांपत्यांनी स्त्रि शिक्षणासाठी सुरु केलेले कार्य तत्कालीन काळाचा विचार केला तर त्यांचे हे कार्य म्हणजे एक मोठी सामाजिक व शैक्षणिक क्रांतीच म्हणावी लागेल. त्यांचे हे कार्य म्हणजे त्याकाळातील सनातनी मंडळींना हा एक मोठा चपराक होता.या मार्गावर मार्गक्रमण करत असताना त्यांना सनातनी मंडळीनी मोठा विरोध केला. अनेक अडथळे आणले, पण फुले दांपत्यांनी न घाबरता मोठ्या धाडसाने आपले कार्य पुढे चालुच ठेवले.

आज २१ व्या शतकात स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात जी उत्तुंग भरारी घेतली आहे. याचे खऱ्या अर्थाने श्रेय फुले दांपत्यांना द्यावे लागेल.



**प्रा.डॉ.सदाशिव दंदे**
अध्यक्ष,
इतिहास अभ्यास मंडळ, स्वा.रा.ति.म.विद्यापीठ, नांदेड

SIDDHI
PUBLISHING HOUSE
(National Publication)
Nanded, Maharashtra (India)
website : www.wiidrj.com

9 788195 547920

Scanned by CamScanner